SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE
Official Publication of Sant Gadge Baba Amravati University

PART - TWO

गुरूवार दिनांक, ९ फेब्रुवारी, २०१७

## अधिसूचना

क्रमांक : ५/२०१७. दिनांक :- ९ फेब्रुवारी, २०१७.

**विषय :२०१६-२०१७ व २०१७-२०१८ या शैक्षणिक सत्राची श्री त्र्यंबक गणपतराव कावलकर संशोधन शिष्यवृत्ती प्रदान करण्याबाबत.**

सर्व संबंधितांचे माहितीकरिता अधिसूचित करण्यात येते की, श्री त्र्यंबक गणपतराव कावलकर संशोधन शिष्यवृत्तीच्या विनियम क्र. ५/२००९ मधील तरतुदीन्वये मा. कुलगुरुंचे मान्यतेनुसार विज्ञान पारंगत (वनस्पतीशास्त्र) परीक्षा उत्तीर्ण असलेल्या प्राप्त आवेदकांमधून सर्वाधिक गुण प्राप्त करणारी व त्यानंतर संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या पदव्युत्तर शैक्षणिक वनस्पतीशास्त्र विभागामध्ये वनस्पतीशास्त्र विषयामध्ये आचार्य पदवीकरीता संशोधन करण्याकरीता प्रवेशित **कु. श्रद्धा केशवराव देशमुख** ही विद्यार्थीनी २०१६-२०१७ व २०१७-२०१८ या शैक्षणिक सत्राच्या श्री त्र्यंबक गणपतराव कावलकर संशोधन शिष्यवृत्तीकरीता पात्र ठरलेली आहे.

**त्यांना प्रति सत्र रु. २५,०००/- याप्रमाणे २ सत्रासाठी एकूण रु. ५०,०००/- शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येत आहे.**

स्वा/-
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

*****

## अधिसूचना

क्रमांक : ६/२०१७. दिनांक : ९ फेब्रुवारी, २०१७.

**विषय :- स्थानिक सुट्टया,२०१७**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील आणि विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयातील तसेच मॉडेल डिग्री कॉलेज, बुलढाणा येथील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सन २०१७ वर्षातील स्थानिक सुट्टया खालीलप्रमाणे जाहीर करण्यात येत आहेत.

**स्थानिक सुट्टया :**

| अ.क्र. | सुट्टीचा दिवस | दिनांक | वार |
|---|---|---|---|
| १. | अक्षय तृतिया | २८.०४.२०१७ | शुक्रवार |
| २. | (नारळी पोर्णीमा)रक्षाबंधन | ०७.०८.२०१७ | सोमवार |
| ३. | जेष्ठगौरी पूजन | ३०.०८.२०१७ | बुधवार |

**टिप :-**

१) सर्व संलग्नित महाविद्यालयातील आणि विद्यापीठाचे स्नातकोत्तर शैक्षणिक विभागातील तसेच मॉडेल डिग्री कॉलेज, बुलढाणा येथील शैक्षणिक कर्मचाऱ्यांना (ॲकॅमिक स्टाफ) फक्त शैक्षणिक नियामके (ॲकॅमिक कॅलेंडर) प्रमाणे सुट्या राहतील.

२) ज्या दिवशी शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सुटी असेल, परंतु शैक्षणिक विभागाला सुटी नसेल त्या दिवशी प्राचार्य/विभाग प्रमुख,हे शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना उपस्थित राहण्याकरिता सूचना देतील व त्याकरिता इतर दिवशी पर्यायी रजा मंजूर करतील, म्हणजे शैक्षणिक कामामध्ये येणाऱ्या अडचणी टाळता येतील.

३) सदर स्थानिक सुट्या विद्यापीठ परिक्षेत्रातील, अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाना व वाशिम या जिल्ह्यांतील सर्व संलग्नित/संचालित महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना लागू करण्यात येत असल्याने अमरावती जिल्हा वगळून इतर जिल्ह्यांमधील संलग्नित/संचालित महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना संबधीत जिल्ह्यांत जाहीर होणाऱ्या स्थानिक सुट्या लागू राहणार नाहीत.

आदेशान्वये –

स्वा/-
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,

*****

## अधिसूचना

क्रमांक : ७/२०१७. दिनांक : ९ फेब्रुवारी, २०१७.

**विषय :- प्रथम /नियमित संलग्निकरणाबाबत..**

सर्व संबंधीतांचे माहीतीकरीता अधिसूचित करण्यात येते की, खाली दर्शविलेल्या महाविद्यालयांकरीता, अभ्यासक्रम / विषय/अतिरीक्त तुकडी च्या संलग्निकरण वाढीसंदर्भात नियुक्त करण्यात आलेल्या चौकशी समित्यांचे अहवाल दि.१३.०१.२०१२ व दि.१३.०७.२०१६ रोजी झालेल्या विद्वत परिषदेने विषय क्र. ३२,१५, ३८ अन्वये मान्य केल्यानुसार स्तंभ क्र.२ मध्ये दर्शविलेल्या महाविद्यालयास, स्तंभ क्र.३ मध्ये दर्शविलेल्या अभ्यासक्रम / विषय / अतिरीक्त तुकडीस, स्तंभ क्र.४ मध्ये दर्शविलेल्या कालावधीकरीता म.वि.कायदा १९९४ मधील कलम ८३, ८६ व ८७ मध्ये दर्शविलेल्या तरतुदींचे अधिन राहुन प्रथम /नियमित संलग्निकरण प्रदान करण्यात येत आहे.

**TABLE**

| Sr. No. | Name of the College | Subject(s) / Course(s)/ Add. Section(s) | Period of continuation of affiliation |
|---|---|---|---|
| 1. | 2. | 3. | 4. |
| 1. | Dr. H. N. Sinha Arts, Commerce College, Patur.Dist- Akola. | M.Sc-I (Chemistry) | For the session 2013-2014 |
| 2. | Rajiv Gandhi Science College, Mehakar Distt. Buldhana. | B.Sc.,<br>B.Com.,<br>B.Sc.(Home-Science)<br>B.C.A. | For the session 2014-2015 |
| 3. | Shri Sant Gajanan Maharaj College of Science & I.T., Karanja ( Lad ) Distt. Washim | B.C.A. | For the session 2015-2016 |

स्वा/-
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,

*****

# अधिसूचना

क्रमांक : ८/२०१७.                                                    दिनांक : ९ फेब्रुवारी, २०१७.

**विषय : विद्यापीठ उन्हाळी-२०१७ परीक्षेपासुन नवीन परीक्षा केंद्र सुरु करण्याबाबत.**

सर्व संबंधीतांचे माहीतीकरीता सूचित करण्यात येते की, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या उन्हाळी-२०१७ परीक्षेपासून खालील महाविद्यालयांमध्ये विद्यापीठाच्या उन्हाळी परीक्षेकरीता परीक्षा केंद्र सुरु करण्यात येत आहे.

| अ.क्र. | गावाचे नाव | महाविद्यालय सांकेतांक | महाविद्यालय / परीक्षा केंद्राचे नाव |
|---|---|---|---|
| ०१ | **अमरावती** | १३२ | तक्षशिला महाविद्यालय, अमरावती. |
| ०२ | **वाडेगाव** जि.अकोला | २६५ | एल.एन.कला महाविद्यालय, वाडेगाव. ता. बाळापुर, जि. अकोला. |
| ०३ | **पिंपळगाव काळे** जि. बुलढाणा | ३७८ | बापुमिया सिराजोद्दीन पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पिंपळगाव काळे, ता. जळगाव जामोद, जि. बुलढाणा |

मा.कुलगुरूंचे आदेशान्वये -

स्वा/-
परीक्षा नियंत्रक,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

*****